**प्रतिवादीतर्फे क्र.२ साक्षीदार स्वत: चा सरतपास**
देवाची शपथ खरे सांगतो
नाव –कल्याणी गजानन हुलके.
वय– ३२ वर्षे व्यवसाय–भु–करमापक
रा.भिसी.ता.चिमुर, जि.चंद्रपुर.

**प्रतिवादीतर्फे सा.क्र.२ चा सरतपास शपथेवर प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे वकील श्रीमती एस.व्ही काळे यांच्या मार्फत शपथेवर सुरू.**

१. मला कोर्टाचा समन्स मिळाला होता. मी मोजणी प्रकरण क्र.२१२/२०१४ चा अभिलेख सोबत आणलेला आहे. दि.०९/१०/२०१४ रोजी मी भुमीअभिलेख कार्यालय,उमरेड येथे भुकरमापक या पदावर कार्यरत होते. दि.०९/१०/२०१४ रोजी मी प्रकरणातील दाखविलेल्या मिळकतीची प्रत्यक्ष मोक्यावर जाऊन मोजणी केली. सदर दिवशी मी मौजा बेलपेठ येथील गट न.४८ व १०८ ची मोजणी केली. त्यानंतर रेकॉर्डप्रमाणे सिमांकण ह्या अर्जदार व लागुधारक यांना समजावुन सांगितल्या. त्यानंतर मी मोजणीची 'अ' शिट तयार केली. मी सदर मोजणीची मुळ 'अ' शिट न्यायालयात सोबत आणलेली आहे. आता मला न्यायालयाच्या अभिलेखावर असलेली सदर मोजणीची 'क' शिट दाखविण्यात आली. सदर 'क' शिट मधील मजकूर व मी सोबत आणलेलया मोजणीच्या 'अ' शिट मधील मजकुर तंतोतंत सारखा आहे व तो खरा व बरोबर आहे. त्यावर माझी मोजणी करणारा भुकरमापक म्हणून सही आहे तसेच त्यावर माझे वरिष्ठ मुख्यालय सहाय्यक यांची सही आहे. सदर मोजणीच्या 'क' शिटला **नि.क्र.५२** देण्यात आला.

२. सदर मोजणीच्या 'अ' शिटप्रमाणे विहीर ही सर्व्हे नंबर ४७ मध्ये दाखविलेली आहे. मोजणीप्रमाणे सर्व्हे नंबर १०८ व ४८ मध्ये विहीर नाही. आता मला नि.क्र.५२ मोजणीची 'क' प्रत दाखविण्यात आली त्यावर मोजणी समयी उपस्थित असलेल्या उपस्थितांची नावे आहेत. मोजणी करतेवेळी वादी श्री. उत्तम झामाजी भुडे हे उपस्थित होते. तसेच त्यांची सही मोजणीच्या 'अ' आणि 'क' शिटवर आहे. वादी उत्तम झामाजी भुडे यांनी मोजणीच्या वेळी उजर घेतला

नव्हता.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>वादी हजर वादीचे वकील गैरहजर सबब प्रकरण उलटतपासासाठी तहकूब.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि १७.०४.२०२६

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड